अति. महा. आयुक्त (ज) कार्यालय
जा.क्र. अतिमआ (ज)/ ८६४८
दिनांक ९/११/२०२०

## कार्यालयीन आदेश

कोव्हिड-१९ चे लॉकडाऊन दरम्यान आरोग्यविषयक काम करणाऱ्या संस्था / व्यक्तींबरोबरच इतरही अत्यावश्यक सेवेतील व्यक्ती आपला जीव धोक्यात घालून त्यांचे कर्तव्य बजावीत होते उदा. पोलीस कर्मचारी, महापालिका कर्मचारी. सदर अत्यावश्यक सेवेतील कर्मचा-यांना कोरोनाची लक्षणे नसलेल्या रुग्णांकडून संक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आईसीएमआर - राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थान यांचेकडून कोव्हिड-१९ या साथीचे संक्रमण कशा पद्धतीने होत आहे हे तपासणीसाठी अत्यावश्यक सेवेतील इतर कर्मचाऱ्यांची The proportion of SARS-CoV-2 याबाबत अभ्यास केला जाणार आहे.

सदर अभ्यासाच्या दृष्टीकोनातून आईसीएमआर - राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थान यांचेकडून महापालिकेतील अधिकारी / कर्मचारी (अत्यावश्यक सेवेसह) यांची दि.१० नोव्हेंबर २०२० रोजी 'जुना G.B. हॉल, पुणे म.न.पा., मुख्य इमारत' येथे स.१०.३० ते सा. ६.०० वा. या वेळेमध्ये कोव्हिड-१९ विषयक तपासणी करणेत येणार आहे.

तरी सर्व खातेप्रमुख यांनी खात्यातील ज्या सेवकांचा नागरिकांशी सातत्याने संपर्क येत आहे व त्यांना कोव्हिड-१९ चे संक्रमण होण्याची शक्यता अधिक आहे अशा सेवकांना उपरोक्त आदेशाची माहिती देण्यात येवून The proportion of SARS-CoV-2 ची तपासणी करून घेणेबाबत उद्युक्त करणेत यावे.

ज्या सेवकांनी दि.०३ नोव्हेंबर २०२० रोजी 'जुना G.B. हॉल, पुणे म.न.पा., मुख्य इमारत' येथे झालेल्या तपासणी मोहिमेमध्ये तपासणी केली असेल त्यांनी पुन:श्च तपासणी करण्याची आवश्यकता नाही.

Rubal 9/11/2020

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत
मा.महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहितीसाठी....

मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ/वि)
पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहितीसाठी....

प्रति,
सर्व खातेप्रमुख
पुढील कार्यवाहीसाठी....